Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)

| VOL- XI | ISSUE- VI | JUNE | 2024 | PEER REVIEW e-JOURNAL | IMPACT FACTOR 8.02 | ISSN 2349-638x |
|---|---|---|---|---|---|---|

# विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात विविध कला आणि संगीताचे योगदान

**प्रा. शरद बळीराम पाडे**
सहाय्यक प्राध्यापक (संगीत)
जयक्रांती कॉलेज ऑफ एज्युकेशन , लातूर

**प्रस्तावना :**

आधुनिक काळातील बालके मुख्यतः संगीत व कला याकडे सहज आकृष्ट होतात व पुढे भविष्यात कला आणि संगीत क्षेत्रात कारकीर्द घडवून स्वतःच्या उज्वल भविष्याची वाटचाल करतात. संगीत ही निसर्गाने मानवाला दिलेली अनमोल देणगी. बालकांच्या विकास हा त्यांच्या जन्मावस्थेपासून अनेक अंगानी होत असतो. शारीरिक,बौद्धिक, भावनिक क्रियात्मक इ. सर्व स्तरांचा विकास म्हणजे बालकांचा सर्वांगीण विकास होय. या विकासात संगीत व कला महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडतात.

**संगीत :**

बालपणी विविध गाणी म्हणणे व ऐकणे यामुळे त्यांना ध्वनीतील काही बारकाव्यांची ओळख होते. स्वर कानावर पडताच ते लक्षपूर्वक ऐकणे, ओळखणे व व्यक्त होणे इ . गोष्टी बालक लहान वयातच शिकू लागतात.

***" गीतं, वाद्यं तथा नृत्य त्रयम् संगीतमुच्यात े"***

म्हणजे गायन वादन व नृत्य या तीन कलांच्या सुंदर संगमा संगीत असे म्हणतात.

अशी शारंग देव यांनी संगीत रत्नाकर या ग्रंथामध्ये संगीताची व्याख्या केली त्याप्रमाणे संगीतातील गायन, वादन व नृत्य कलेच्या मदतीने बालकांना स्वतःचा विकास करण्यासाठी कला अत्यंत महत्वपूर्ण भूमिका बजावतात.

**कला :** "ज्या बालकाला ज्या गोष्टीत आनंद मिळतो त्यात फायदा नुकसान नफा तोटा याचा चुकूनही विचार नसतो अशी गोष्ट करण्याची क्रिया म्हणजे कला"

खरे तर 'कला' म्हणजे काय याचे अचूक उत्तर देणे सोपे नाही. संगीताप्रमाणे कलेमुळे ही विविध भाषाभेद व रंगभेद ओळखून त्यामध्ये असलेल्या विविधता स्वतःच्या कल्पक बुद्धीने विद्यार्थी मांडू शकतात.

राष्ट्रीय कवयित्री मैथिली शरण गुप्ता यांनी कलेच्या संदर्भात आपले मत व्यक्त करताना म्हटले आहे -

*"कला ही अभिव्यक्तीची कुशल शक्ती आहे."*

एका महान इटालियन विद्वानाने कलेचा अभिव्यक्तीचे साधन म्हणून विचार करताना असेही म्हटले आहे — "कलेच्या संबंधात केवळ स्वानुभवानेच कलेचे स्वरूप प्राप्त होते. त्यामुळे अभिव्यक्तीची परिपूर्णता ही कला आहे, अभिव्यक्ती हे तिचे सौंदर्य आहे."

भारतीय पारंपारिक 64 ललित कला आहेत 'ललित विस्तार' या ग्रंथात पुरुष कला या मथळ्याखाली 86 कलेचा उल्लेख सापडतो.त्यामध्ये शिल्पकला, मुर्तीकारी, चित्रकला, विणकाम इ.कलांचा समावेश होतो. भौगोलिकरित्या ह्या कला संपूर्ण भारतीय उपखंडात पसरलेल्या आहेत ज्यात भारतासह, पाकिस्तान आणि बांगलादेशचा समावेश आहे. संगीत व कला यामुळे बालके शांत व सुसंवादी होण्यास खूप मदत होते. एखाद्या बालकाला भाषा शिकून त्याच भाषेत स्वतःचे भविष्य घडवायचे असेल तर कला आणि संगीत ही त्यांच्यासाठी प्रमुख तत्वे मानली जातात. या दोन्ही कला बालकांना कल्पकतेने विचार करण्यास आणि भाषेवर प्रभुत्व मिळविण्यासाठीच्या क्षमता वृद्धिंगत करण्यास मदत करतात. आजच्या प्रत्येक शाळेत संगीत व कला हे महत्त्वाचे विषय बनत आहेत. आज प्रत्येक शाळेत प्रार्थना,स्फूर्तीगीते,बालगीते,पासायदान,स्नेहसंमेलन निमित्त गायन, वादन, नृत्य, चित्रकला, मूर्तीकला इत्यादी विविध

Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
VOL- XI ISSUE- VI JUNE 2024 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 8.02 ISSN 2349-638x

विषय घेऊन बालके स्वतःचा आत्मविश्वास वाढवत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. आज बऱ्याच सीबीएसई शाळेपासून ते जिल्हा परिषद शाळांमध्ये संगीत व कला हे विषय सर्व बालकांना आवश्यक म्हणून जाहीर केले आहेत .बालकांना कला आणि संगीत स्पर्धा आणि कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी प्रवृत्त केले जात आहे.

एक पाश्चात्य विचारवंत म्हणतो.

" ज्या शिक्षकाला संगीत व कला येणार नाहीत त्या शिक्षकाला मी माझ्या शाळेत बालकांना अध्यापन करण्यासाठी घेणार नाही " एवढे अनन्य साधारण महत्त्व त्या काळात संगीत व कलांना होते म्हणून प्रत्येक बालकांच्या सर्वांगीण विकासात संगीत व कला यांची भूमिका किती महत्वपूर्ण आहे यासाठी हा अभ्यास विषय अत्यंत उपयुक्त आहे.

कला आणि संगीताचे विद्यार्थ्यांच्या जीवनातील योगदान खालील मुद्यांच्या आधारे आपणाला स्पष्ट करता येईल.




**संगीत मेंदूला चालना देते**

'Music is food of Mind' या इंग्रजी उक्तीप्रमाणे संगीत हे मनाचे व मेंदूचे अन्न आहे बालकांचा मेंदू सुदृढ असेल तर मुले कोणत्याही क्षेत्रात गरुड झेप घेऊ शकतात. बालकांचे मन व मेंदू संस्कारक्षम करावयाचा असेल तर संगीत व कलांचा आश्रय घेणे अत्यंत गरजेचे आहे. अनेक पालक अभ्यासेत्तर क्रियाकल्पामध्ये संगीताची गणना करतात. परंतु बालकांच्या शिक्षणात संगीत व कला या दोन गोष्टी महत्वपूर्ण भूमिका बजावत असतात. संगीतामुळे बालकांच्या मेंदूची शक्ती वाढण्यास मदत होते. आपल्या भारतीय संस्कृतीमध्ये पूर्वी बाळाची आई अंगाई,भूपाळी,ओव्या इत्यादी गीते गाऊन त्याचे संगोपन करायची. खूप जोर- जोरात रडत असलेल्या मुलांना

***निबोणीच्या झाडा मागे चंद्र झोपला ग बाई***
***आज माझ्या पाडसाला झोप का ग येत नाही...***

आई अशी अंगाई गीते गायची व ते बालक संगीताच्या स्वर विश्वात गाढ झोपी जायचे . संगीतामुळे बालकांच्या मेंदूची शक्ती वाढते.कलेच्या वातावरणात वाढलेले बालके इतर बालकांच्या तुलनेत अधिक सर्जनशील असतात त्यामुळे मुलांना वर्गात व वर्गाबाहेर उत्कृष्ट कामगिरी करण्यास कला प्रवृत्त करतात. कलेमुळे बालकांच्या विचार करण्याच्या प्रवृत्तीत वाढ होते. त्यामुळे ही मुले कोणत्याही वातावरणात प्रेमाने राहतात. आनंदाने प्राप्त परिस्थितीशी एकरूप होतात. कलेमुळे त्यांच्या वृत्तीत अनुकूल बदल होतो व प्रत्येक कार्यक्रमातील त्यांची उपस्थिती हा एक आनंद सोहळा असतो. याच छोट्या - मोठ्या प्रसंगातून त्यांचा आत्मविश्वास वाढण्यास मदत होते. त्याचबरोबर जीवन मूल्यांची रुजवणूकही होते.

**संगीतामुळे स्मरणशक्ती वाढीस लागते:**

प्राचीन काळापासून संगीत तज्ञांनी केलेल्या संशोधनानुसार संगीतामुळे बालकांची स्मरणशक्ती वाढीस लागते हे सिद्ध केले आहे. जर बालके दिलेला गृहपाठ, वर्गपाठ विसरत असतील तर संगीत त्यांना लक्षात ठेवण्यासाठी मदत करते. अवघड कविता, इतिहासातील घटना, गणितातील अवघड सूत्रे यामुळे बालकांच्या मनावर, बुद्धिवर विपरित परिणाम होतो. त्यामुळे बालके कंटाळा करतात. तर हीच सूत्रे , अवघड कविता, इतिहासातील प्रसंग, त्यांच्या कायम स्मरणात राहावे असे वाटत असेल तर संगीताच्या माध्यमातून कवितांना सोप्या संगीतमय चाली लावून पोवाडा गीत प्रकारातून इतिहासाचे

जिवंत चित्र स्वर, ताल, लयीच्या साह्याने बालकांपुढे मांडले तर त्यांना आयुष्यभर त्या गोष्टी स्मरणात राहतील.

**संगीत आणि कला सर्जनशीलता वृद्धिंगत करतात:**

शालेय जीवनात दिसून येते की, संगीत आणि कला बालकांना अधिक सर्जनशील बनवतात आणि त्यांची विचार करण्याची क्षमता वृद्धिंगत करतात. कलेच्या मदतीने बालके स्वतःला सादर करण्यास प्रवृत्त करतात आणि एखादी कला सादर करण्यासाठी आणि संगीत वाजविण्यासाठी स्वतः पुढाकार घेतात. नवनवीन कौशल्य विकसित करतात भरपूर कंपन्यांचे म्हणणे आहे , जेव्हा अशी मुले कर्मचारी म्हणून नियुक्त होतात तेव्हा त्यांची सर्जनशीलता कौशल्य वाखाण्या जोगी असतात.

**संगीत सामाजिक कौशल्य वाढवते :**

बालकाच्या मेंदूची शक्ती सुधारण्याबरोबरच संगीतामुळे मुलांना सामूहिक कार्य, नेतृत्व, कौशल्य, शिस्त आणि इतरांशी संवाद कसा साधावा यासारखे सामाजिक कौशल्य शिकवता येतात. त्यामुळे त्यांची सामाजिक प्रतिमाही विकसित होऊ लागते. कला आणि संगीत भाषा आणि वाचन कौशल्य वाढवतात. कला आणि संगीत बालकांच्या मेंदूचा गतीने विकास करतात. आणि त्यांचे भाषा आणि वाचन कौशल्य देखील वाढवू शकतात म्हणून आजच्या प्रत्येक शैक्षणिक संस्थांमध्ये कला आणि संगीत विषय आवश्यक केला आहे. भाषा आत्मसात करण्यासाठी संवाद कौशल्यासाठी कला व संगीत प्रमुख भूमिका निभावतात. त्या बालकांना भाषा विकासाच्या संधी प्रदान करतात. कला व संगीत बालकांच्या मनातला आत्मविश्वास निर्माण करण्याचे काम करतात.

**कला आणि संगीतामुळे आत्मविश्वास वाढतो :**

बालकांच्या सातत्याच्या प्रयत्नामुळे दैनंदिन सरावाने त्यांची विविध कौशल्य वाढू लागतात. जेव्हा बालक कृती कार्यक्रमामध्ये भाग घेतात आणि एकमेकांचे दोष आणि गुणांची मोकळ्या मनाने चर्चा करतात तेंव्हा त्यांनी एकमेकांची केलेले सुसंवाद,विविध गुण- दोषांची मुक्त चर्चा यामुळे त्यांच्यातला आत्मविश्वास वाढतो .

**कला व संगीत सांस्कृतिक आणि वैयक्तिक संबंध निर्माण करतात :**

कला आणि संगीत बालकांना आपल्या संस्कृतीशी जोडून ठेवतात. कलेच्या मदतीने बालक इतिहासातील विविध संशोधने शोधण्याचा प्रयत्न करतात त्याचबरोबर कला आणि संगीत त्यांना सांस्कृतिक विविधता शोधण्यात मदत होते. शिल्प आणि चित्रकलेच्या मदतीने वेगवेगळ्या संस्कृतीचा शोध घेण्यास मदत करतात. भिन्न संगीत ऐकणे आणि शिकणे आणि त्याचा इतिहास शोधणे यामुळे बालके प्राचीन संगीत संस्कृतीशी जोडले जातात व त्यांच्यातला कल्पकता गुण विकसित होतो.

**सारांश**

वरील सर्व विवेचनावरून हे स्पष्ट होते की, सर्वांगीण विकासात कला आणि संगीताचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण आहे व ती काळाची गरज आहे. संगीत हे एक जीवनानुभूती देणारे माध्यम म्हणून पहिले तर विद्यार्थ्यांच्या जीवनातील भावात्मक क्षेत्रातील असणारी उदिष्टे आपणाला सध्या करता येतील आणि कलेचे असणारे विविध प्रकार हे विद्यार्थ्यांचे क्रियात्मक उदिष्टे आपणाला सहज सध्या करता येतील.

संगीताचे आपल्या जीवनातील असणारे महत्व लक्षात घेतले तर आपल्या लक्षात येईल की , विद्यार्थी आपल्या व्यस्त दिनचर्येतून आपली आवड व जिज्ञासा शमवण्यासाठी अनेक गोष्टीची मदत घेत असतो. त्यात संगीत व कला त्यांच्या जीवनात खूप फायदेशीर ठरतात म्हणून पालकांनी व शिक्षकांनी वरील कलांचा सारासार विचार करून आपल्या विद्यार्थ्यांचे भविष्य उज्वल करायचे असेल तर संगीत् व कला विध्यार्थ्यांच्या जीवनात असणे अत्यंत महत्त्वपूर्ण आहे.

**संदर्भ सूची :**

1. http://www.mr.wikipedia.org ›wiki› भारतीय_कला
2. http://www.aathavanitil-gani.com
3. http://www.anantaajournd.com